## प्रकरण सहावे

## उ प सं हा र

# प्रकरण सहावे

## उ प सं हा र

### ६.१ प्रस्तावना :

भारत देश हा शेतीप्रधान देश आहे. भारतातील नव्वद टक्के लोकांचे जीवन शेती व्यवसायावर अवलंबून आहे. देशाच्या विकासासाठी शेती उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी शेती व्यवसाय प्रगत करणे आवश्यक आहे. त्याकरिता शेतक-यांना वीज, पाणी, आधुनिक बी-बियाणे, खते, अवजारे यांचा पुरवठा होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने भारत स्वतंत्र झाल्यानंतर भाकरा नांगल, हिराकूड, दामोदर, कोयना या-सारखी धरणे बांधण्यात आली. शेतीच्या विकासाच्यादृष्टीने धरणे ही आवश्यक बाब बनली आहे.

राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याचा प्रश्न महत्वाचा बनला आहे. विविध माध्यमाद्वारे शेतीला पाणी देवून विकास करण्याचा प्रयत्न सुरु झाला. औद्योगिक विकास व शेती विकास यासाठी जलसंपत्ती व तिचे नियोजन आवश्यक आहे. जलसंपत्ती ही शेतीची शक्ती आहे. तिचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शासन पाण्याचे नियोजन व नियंत्रण या गोष्टींचा विचार सुरु केला आणि त्या दृष्टीने धरणे व पाटबंधारे योजना यांची सुरुवात झाली. शेतक-यांना जलसिंचन व पाटबंधारे यांच्या सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी देशभर लहान मोठी धरणे बांधावीत असा निर्णय देश स्वातंत्र्य झाल्यानंतर घेण्यात आला. त्यातूनच विकासाचे राज-कारण सुरु झाले. विकासाच्या राजकारणामध्ये निरनिराळे पाटबंधारे प्रकल्प बांधणे आणि त्याद्वारे हरितक्रांती घडवून आणने हा एक महत्वाचा कार्यक्रम ठरला. याचा परिणाम म्हणून वेगवेगळया राजकीय पुढा-यांच्यामध्ये

धरण बांधण्यासाठी व धरण बांधावयाचे असेल तर कोणत्या ठिकाणी बांधावयाचे याबाबत संघर्ष सुरु झाले.

विकासाच्या राजकारणामध्ये महाराष्ट्रातही अशा प्रकारचे संघर्ष झाले. दक्षिण महाराष्ट्रात वारणा नदीवर बांधावयाच्या धरणाबाबत फार मोठा संघर्ष झाला. वारणा नदी ही प्रामुख्याने सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या सीमेवरुन वाहते. या धरणाच्या जागेबाबत महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाचे व ज्येष्ठ पुढारी श्री राजारामबापू पाटील व श्री वसंतदादा पाटील यांच्यात मतभेद झाले. हे मतभेद श्री राजाराम बापू व श्री वसंतदादा पाटील यांच्या राजकीय जीवनाच्या संदर्भात महत्वाचे ठरले. या दोघांचे राजकीय जीवन १० वर्षे या प्रश्नाभोवती फिरत राहिले.

## ६.२ <u>अभ्यासाचा उद्देश</u> :

प्रस्तुत प्रबंधामध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात नव्याने निर्माण होणाऱ्या राजकीय समतोलाच्या संदर्भात धरणाच्या जागेबाबत हा जो वाद होता त्याचा अभ्यास केला आहे. या अभ्यासात या वादामध्ये कोणत्या प्रकारचे विकासाचे प्रश्न गुंतले होते आणि उभय बाजूंच्या लोकांनी कशाप्रकारे चळवळी सुरु केली व आंदोलने उभारली, निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकला, शेवटी चांदोलीचीच जागा महाराष्ट्र सरकारने का मान्य केली याचा अभ्यास करण्यात आला आहे.

## ६.३ <u>सारांश</u> :

प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात(कृषी औद्योगिक समाजाची स्थापना) व विकासाचे राजकारण यांचा अभ्यास केला आहे. देश स्वतंत्र झाल्यानंतर भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु यांनी देशाच्या प्रगतीच्यादृष्टीने अनेक योजना

सुरु केल्या. त्यात सामुदायिक विकास योजना, सहकारी चळवळ आणि पंचायत राज्यसंस्थाची भूमिका महत्त्वाची आहे. कृषी औद्योगिक समाज ही एक विकास प्रक्रियेची पूर्ती आहे. [१] या संकल्पनेत आर्थिक विकासाचे अर्थशास्त्रीयदृष्टया एक प्रतिमान दिसून येते. कृषी औद्योगिक समाजाचे प्रवर्तक यशवंतराव चव्हाण यांचे मते, या समाजाच्या निर्मितीसाठी शेती व उद्योग शहरी व ग्रामीण विभाग, राज्यातील विकसीत व अविकसीत भाग यांचा समन्वय करुन संतुलित विकासाची प्रक्रिया कार्यान्वीत झाली पाहिजे. त्यासाठी स्थानिक, प्रादेशिक उत्पादक शक्तींचा घटकांचा व साधनसामुग्रीचा वापर कार्यक्षमतेने झाला पाहिजे. कृषि औद्योगिक समाजात केवळ आर्थिक शक्तीचे विकेंद्रीकरण अभिप्रेत नाही तर राजकीय व प्रशासकीय सत्तेचे विकेंद्रीकरण अपेक्षित आहे. कृषी औद्योगिक समाजाच्या विकासासाठी शेतीस पाणी मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध धरणे व पाणी योजना सुरु करण्यात आल्या.

महाराष्ट्रातील सिंचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने सर्व उपायांचा अभ्यास करण्यासाठी श्री स.ग. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक सिंचन आयोग नेमण्यात आला. या समितीने विविध योजना सुचविल्या. सांगली जिल्हयाच्या शेती विकासासाठी वारणा नदीवर धरणे बांधण्याचा सरकारने निर्णय घेतला. पण हे धरण कोणत्या जागेवर व्हावे याबाबत सांगली जिल्हयाचे दोन ज्येष्ठ नेते श्री वसंतदादा पाटील व श्री राजारामबापू पाटील यांच्यात वाद निर्माण झाला. त्या वादामुळे सांगली जिल्हयाचे राजकारण ढवळून निघाले.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये सध्याच्या चांदोली धरणाची सर्व तांत्रिक माहिती त्यांचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचबरोबर सांगली

जिल्ह्याची माहिती ही घेण्यात आली आहे. धरणाच्या जागेच्या वादानंतर श्री राजारामबापू पाटील व श्री वसंतरावदादा पाटील यांनी चर्चा करून चांदोलीची निवड केली. त्याप्रमाणे खुजगांव एवढी जमिन ओलिताखाली येते व कमी पुनर्वसन करावे लागते आणि धरणाच्या पाण्याखाली कमीत कमी जमिन जाते म्हणून या जागेची निवड करण्यात आली. सध्याच्या वारणा नदीवरील चांदोली धरणामध्ये ३५ टी.एम्.सी. एवढा पाणीसाठा होत असून जलसिंचनासाठी कालवा व उपसा या सिंचनाच्या दोन्ही मार्गांचा अवलंब केला आहे. तसेच या चांदोली धरणामुळे जवळ जवळ २,८०,००० एकर जमिन ओलिताखाली येणार आहे. याचा फायदा सांगली व कोल्हापूर जिल्हयातील तालुक्यांना मिळणार आहे. चांदोली धरणाच्या पाण्यावर १६ मेगॅवॅट एवढी वीजही निर्माण केली जाणार आहे. [२]

सर्वश्री वसंतदादा पाटील व राजारामबापू पाटील यांच्यात तडजोड झाल्यामुळे उपसा सिंचनाबरोबर कालवा सिंचनाचा त्यात समावेश करण्यात आला. या वादाची पार्श्वभूमी काय होती या दोन्ही नेत्यांनी आपले राजकीय डावपेच कशाप्रकारे लढविले, लोकांच्या चळवळी कशा प्रकारे उभारल्या आणि शेवटी निर्णय कसा लागला या गोष्टींची चर्चा पुढील दोन प्रकरणामध्ये करण्यात आली आहे.

धरणाच्या जागेबाबत वाद कसा निर्माण झाला याचा आढावा तिसऱ्या प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे. देश स्वतंत्र्य झाल्यानंतर शेतीच्या विकासाच्यासाठी धरणे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी कृष्णा व तिच्या उपनद्या यांचा अभ्यास करून खुजगांव या ठिकाणी वारणा नदीवर धरण बांधण्यास केंद्र सरकार व राज्य सरकारने १९६६ मध्ये मान्यता दिली. शासनाने खुजगांव जागेला मान्यता दिल्यानंतर या जागेबाबत वाद निर्माण झाला. प्रामुख्याने हा वाद खुजगांव की चांदोली ? पाट की

उपसा ? या स्वरुपात झाला. कुजगांव या ठिकाणी धरण बांधण्याबाबत जो वाद निर्माण झाला त्यामध्ये काही तांत्रिक मुद्दे वादातील ठरतांना दिसतात. पुढे मात्र या वादामध्ये राजकारण शिरले व तो एक राजकीय प्रतिष्ठेचा प्रश्न मानून त्याकडे पाहिले जावू लागले. श्री वसंतदादा पाटील व श्री राजारामबापू पाटील आणि त्यांचे समर्थक आपल्याच बाजू कशा बरोबर आहेत हे पटवून देत होते.

कुजगांव की चांदोली ? या वादामध्ये प्रामुख्याने प्रथम धरणाच्या पाण्याखाली बुडणारी जमिन हा मुद्दा या वादामध्ये प्रथम पुढे आला. श्री राजारामबापू पाटील कुजगांवचा आग्रह धरत होते. तर वसंतदादांचा या जागेला विरोध होता. त्यांच्या कुजगांव धरणामुळे मोठ्या प्रमाणात जमिन धरणाच्या पाण्याखाली जाणार होती व त्यापैकी बहुतांशी जमिन ही पिकावू व सुपीक होती. कुजगांव धरणामुळे १०,००० हेक्टर्स जमिन धरणाच्या पाण्याखाली जावून ३२ गावे व ४०,००० लोकांचे पुनर्वसन करावे लागणार होते. तर चांदोलीमुळे ७,००० लोकांचे पुनर्वसन करावे लागून फक्त ६,००० एकर जमिन धरणाच्या पाण्याखाली जाणार होती. तसेच धरणाच्या खर्चाबाबतही या प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात आला आहे. कुजगांव धरणासाठी कालवे व धरण मिळून ७० कोटी रुपये खर्च येणार होता तर कालव्याच्या खर्चामध्ये म्हणजे ३२ कोटी रुपयात चांदोली धरण बांधून होईल असे वसंतदादांचे मत होते. जरी कुजगांव धरणाचा खर्च जास्त येत असला तरी ते चांदोलीपेक्षा कसे फायदेशीर आहे हे बापूंच्या समर्थकांनी व विचारवंतानी कसे पटवून दिले आहे याचाही आढावा घेण्यात आला आहे. कुजगांवमुळे होणारे डेड वॉटर याचाही मुद्दा वादामध्ये पुढे आला होता. तसेच उपसा की पाट ? हा मुद्दाही या वादामध्ये महत्वपूर्ण ठरला होता. कुजगांव की चांदोली या वादामध्ये प्रामुख्याने धरणाच्या पाण्याखाली बुडणारी जमिन उठवावी लागणारी

गांवे, त्यांचे करावे लागणारे पुनर्वसन, धरणासाठी येणारा खर्च, निरूपयोगी पाणी साठा, पाट की उपसा जलसिंचनासाठीचा मार्ग, उपसासाठी करावा लागणारा नित्य खर्च हे मुद्दे या वादामध्ये प्रकर्षाने पुढे आले. दोन्ही बाजूने आपले मुद्दे कसे पटवून दिले आहेत याचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. यात प्रामुख्याने गो.ना. पंडीत, गजानन हुशार, इकॉनॉमिक टाईम्स, वि.म. दांडेकर, आप्पासाहेब गोटखिंड, शामराव पाटील, विलासराव शिंदे, राजारामबापू पाटील, श्री वसंतदादा पाटील अशा विचारवंताची व पुढा-यांची मते धरणाच्या जागेच्या वादाबाबत या प्रकरणात आजमावली आहेत.

थोडक्यात या जागेच्या वादामध्ये अनेक महत्वाचे मुद्दे पुढे मांडण्यात आले व दोन्ही बाजूंनी ते कसे बरोबर आहेत हे पटवून देण्याचे प्रयत्न करण्यात आले. या सर्व मुद्दयाबरोबरच या विकासाच्या राजकारणाला पक्षीय व पक्षांतर्गत गटबाजीची एक बाजू होती व त्याचा अभ्यास चौथ्या प्रकरणात करण्यात आला आहे.

धरणाच्या जागेच्या वादामध्ये राजकारण कसे शिरले व त्यातून दोन्ही गटामध्ये शक्तीप्रदर्शन होवून चांदोली ही धरणाची जागा तडजोडीने कशी ठरली याची चर्चा पाचव्या प्रकरणात करण्यात आली आहे. वारणा नदीवर बांधल्या जाणा-या धरणाच्या जागेबाबतचा वाद सर्व महाराष्ट्रभर गाजला. कारण या वादात सांगली जिल्हयातील दोन्ही मातब्बर व ज्येष्ठ नेते श्री. वसंतदादा पाटील व श्री राजारामबापू पाटील गुंतले होते. धरणाच्या जागेबाबतचे राजकारण पाहतांना प्रत्यक्ष या प्रकरणात सांगली जिल्हयातील गटबाजीचे राजकारण कसे होते याची चर्चा करण्यात आली.आहे. सांगली जिल्हयात सुरूवातीपासून दादा व बापू गट अस्तित्वात होते. परंतु या दोन्ही गट समोरासमोर उभे या वादापर्यंत उभे ठाकले नव्हते. सुरूवातीच्या काळात म्हणजे १९५९ साली राजारामबापू पाटील महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष

झाले. त्यानंतर १९६२ मध्ये राज्य मंत्री मंडळात उपमंत्री तर पुढे लगेच कॅबीनेट मंत्री झाले. तर वसंतदादा पाटील योवेळी स्थानिक पातळीवर व सहकार क्षेत्रामध्ये काम करत होते. याच दरम्यान कॉंग्रेस पक्ष गटाच्या राजकारणाने बाधित झाला. जिल्ह्यात दादा व बापू असे दोन्ही गट कार्य करत होते. परंतु त्यावेळच्या राजकीय परिस्थितीमुळे हे दोन्ही गट कॉंग्रेस पक्षाच्या नियंत्रणात होते. पुढे कॉंग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी राजारामबापू पाटील, वसंतदादा पाटील व गुलाबराव पाटील यांना त्यांची कार्यक्षेत्रे ठरवून दिली. राजारामबापू पाटील यांनी राज्य पातळीवर मंत्री म्हणून काम बघायचे, श्री वसंतदादा पाटील यांनी सहकार क्षेत्र व संघटनात्मक पातळीवर काम करायचे. असे ठरले. म्हणजे सांगली जिल्ह्यात गटबाजी असून ही तडजोडीचे राजकारण सुरु होते. यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव होता तोपर्यंत हे तडजोडीचे राजकारण व्यवस्थित चालले. परंतु १९७२ मध्ये वसंतदादा राज्याच्या मंत्री मंडळात पाटबंधारे मंत्री झाले व राजारामबापूंना मंत्रीमंडळातून वगळण्यात आले आणि जुनी परंपरा या ठिकाणी मोडली . येथून पुढे दोन्ही गट एकमेकांच्या विरुध्द उघड उभे राहिले. [3] आणि या गटबाजीचाच परिणाम व राजकारण धरणाच्या जागेबाबत शिरले.

केंद्राने व राज्याने खुजगांवला मान्यता देवून ही खुजगांवला विरोध होवू लागला. कारण राजारामबापू खुजगांवचे समर्थन करत होते व खुजगांव धरण झाले तर त्याचे सर्व श्रेय राजारामबापूना मिळणार होते व हा एक फार मोठा शह वसंतदादांना व त्यांच्या गटाला बसणार होता. त्यामुळे त्यांनी या जागेला विरोध करायला सुरुवात केली. त्यात वसंतदादा मंत्रीमंडळात राज्यमंत्री झाले. त्यामुळे त्यांचा प्रभाव वाढला. बापूना मंत्रीमंडळातून वगळले. त्यामुळे निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी व आपले स्थान बळकट करण्यासाठी चळवळ उभी केली, लोकांना विविध माध्यमाद्वारे जागृत केले. शासनावर दबाव आणण्यासाठी ११ जून १९७३ रोजी इस्लामपूर येथे दीड लाख लोकांची खुजगांव

धरणा परिषद भरवली व आपल्या मागे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील जनता, सहकारी साखर कारखाने, त्यांचे चेअरमन, स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांचे पदाधिकारी यांचा पाठिंबा मिळवला. [४]

पुढे हा वाद अत्यंत विकोपाला गेल्यानंतर श्री यशवंतराव चव्हाण यांच्या सूचनेवरून वसंतदादा पाटील व राजारामबापू पाटील यांनी धरणाच्या जागेबाबत तडजोड केली. यात प्रामुख्याने धरणाच्या पाण्याखाली कमी जमिन जाणारी, पुनर्वसन कमी प्रमाणात करावे लागणारी व कुजगांव एवढे क्षेत्र ओलिताखाली आणणारी व पाट आणि उपसा या दोन्हीचा अवलंब करणारी योजना चांदोलीच्या तडजोडीतून स्विकारण्यात आली.

प्रस्तुत प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणांत कुजगांव धरणाच्या जागेचा वादा संबंधीचा टीकात्मक अभ्यास करण्यात आला आहे. श्री राजारामबापू पाटील व श्री वसंतदादा पाटील यांच्यामध्ये शक्ती परिक्षण झाले. दोघांनीही आपआपल्या भूमिकांना मूरड घातली आणि १९७४ साली या धरणाला सर्वांनी मान्यता दिली. या वादामध्ये श्री राजारामबापू यांनी आपले राजकीय लढवय्येपण सिध्द केले आणि मोठ्या प्रमाणात जनजागृती घडवून आणली. या गटबाजीमुळे ते कॉंग्रेस पक्षाच्या बाहेर पडले व विरोधी पक्षाचे राजकारण केले. श्री वसंतदादा पाटील यांनी चांदोली प्रकरणात श्री राजारामबापूंच्यावर काही प्रमाणात बाजी मारली व कॉंग्रेसच्या राजकारणात त्यांना एकटे पाडले. संपूर्ण जिल्ह्यावर स्वत:चे वर्चस्व प्रस्थापित केले. नंतरची दहा वर्षे वसंतदादा पाटील व राजारामबापू पाटील यांच्या परस्पर विरोधी राजकारणात गेली. परंतु राजारामबापूनी विरोधी पक्षातून राहून ही वाळवा, खानापूर, कवठेमहाकांळ, आटपाडी या दुष्काळी आणि मागासलेल्या तालुक्यांच्यामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले. नव्याने मान्य झालेल्या धरणाच्या गुणदोषांची ही यात चर्चा करण्यात आली आहे.

## ६.४ अभ्यासाचे निष्कर्ष :

सदरच्या धरणाच्या जागेबाबतचा वादाचा अभ्यास करत असताना प्रामुख्याने पुढील निष्कर्ष हाती येतात. वारणा नदीवर बांधावयाच्या या धरणाबाबतचा वाद जवळजवळ १० वर्षे चालला व सर्व महाराष्ट्रभर गाजला. कारण या वादामध्ये सांगली जिल्ह्यातील दोन ज्येष्ठ नेते होते. श्री राजाराम-बापू पाटील व श्री वसंतदादा पाटील हे दोन्ही नेते राज्यपातळीवरील प्रसिध्द राजकीय नेते होते. त्यामुळे या वादाला एक वेगळेच राजकीय महत्व प्राप्त झाले. प्रामुख्याने या वादाची राजकीय फलश्रुती पुढील मुद्दयातून सांगता येईल.

१) वारणा नदीवर बांधावयाच्या धरणाच्या जागेबाबतचा वाद जवळ जवळ १० वर्षे गाजला. या धरणाच्या जागेसाठी सरकारने विविध कारणासाठी काही जागा बदलून खुजगांव ही तांत्रिकदृष्टया योग्य जागा आहे म्हणून १९६६ मध्ये त्याठिकाणी धरण बांधण्यास केंद्रसरकार व राज्य-सरकारने परवानगी दिली. परंतु १९७२ साल उजाडले तरी धरणाच्या बांध-कामाला सुरुवात झाली नाही. तेव्हा राजारामबापूनी आक्रमक पवित्रा घेवून लोकांना जागृत करुन चळवळ उभी केली. प्रामुख्याने खुजगांव धरणाला त्यावेळचे पाटबंधारे मंत्री वसंतदादा पाटील यांचा विरोध होता. सांगली जिल्ह्याच्या राजकारणात पूर्वीपासूनच दादा व बापू गट होते. परंतु या वादानंतर ते उघड उघड एकमेकांविरुध्द उभा राहिले. त्यामुळे वाद फारच चिघळला. १७ जून, १९७३ ला बापूनी इस्लामपूर येथे मोठी खुजगांव धरण परिषद घेतली व जनतेच्या चळवळीतून सरकारवर दबाव टाकला. याचा परिणाम म्हणून शासनाची पाऊले तडजोडीकडे उचलली गेली व मार्च १९७५ मध्ये धरण जागेबाबत दादा व बापू यांचेमध्ये तडजोड झाली. प्रामुख्याने पुढील मुद्दयांचा विचार करुन तडजोड झाली. मागील प्रकरणात या मुद्दयांची व्यवस्थीत

अभ्यास करण्यात आलेला आहेच.

अ) राजारामबापूंच्या मतानुसार खुजगांव एवढे क्षेत्र इतर धरणामुळे ओलिताखाली आले पाहिजे. हा बापूंचा मुद्दा याठिकाणी मान्य झाला. तसेच संपूर्ण वाळवा तालुका ओलिताखाली यावा ही बापूंची इच्छा होती तीही या ठिकाणी मान्य झाली.

ब) कालव्याने पाणी शेतकऱ्यांना कमी खर्चात मिळते असे बापूंचे मत होते. तर लिफ्टमुळे आवश्यकतेएवढेच पाणी शेतीला देता येते असे दादांचे मत होते. या तडजोडीमध्ये दोन्ही मुद्दे मान्य करण्यात आले व लिफ्ट आणि कॅनॉलची सोय करण्यात आली.

क) खुजगांवमुळे जास्त जमिन धरणाच्या पाण्याखाली जाते व मोठया प्रमाणात गावे उठून पुनर्वसन करावे लागेल व त्यामुळे खर्च वाढेल. हा वसंतदादांचा मुद्दा तडजोडीमध्ये मान्य करण्यात आला.

थोडक्यात धरणाची पर्यायी जागा स्विकारतांना श्री राजारामबापू पाटील व वसंतदादा यांनी जे मुद्दे मांडले ते दोन्ही बाजूचे मुद्दे या तडजोडीत मान्य करण्यात आले. असले तरी नंतरच्या काळामध्ये वसंतदादांचे राजकीय वर्चस्व वाढत गेले. नाही म्हटले तरी वसंतदादांचा या वादामध्ये वरचष्मा राहिला. याची अनेक कारणं असतील. तरीसुध्दा या वादावेळी ते सत्तेत होते हे महत्वपूर्ण कारण दिसते. कारण राजारामबापू सत्तेत असतांना सरकार खुजगांव जागेचा पुरस्कार करत होते. बापू सत्तेतून बाहेर गेल्यानंतर सरकारचे मत बदलले.

२) या अभ्यासामध्ये दुसरी गोष्ट पुढे आली ती म्हणजे जनतेची चळवळ राजारामबापूंनी सरकारवर दबाव आणण्यासाठी, निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी जनतेची चळवळ उभी केली व जनतेला संघटीत करुन जनतेची ताकत

किती मोठी असते हे सरकारला दाखवून दिले. राजारामबापूच्यामुळे जनतेला चळवळीचा व संघटनेचा मार्ग मिळाला. या वादामुळे राजारामबापूंचे लढावू गुण दिसून आले व त्यानंतरची दहा वर्षे बापूनी सांगली जिल्हा व महाराष्ट्राच्या राजकारणावर गाजवली.

३) या वादामुळे राजारामबापूंच्या राजकारणाचे नवे स्वरूप दिसून आले. विधायक व विकास कामातून ही राजकारण कसे खेळले जाते ते या वादामुळे दिसून आले. राजारामबापूनी सत्तेच्या बाहेर राहूनही जनतेला संघटित करून त्यांची चळवळ उभी केली व सरकारवर दबाव टाकून बाजी मारण्याची नवी राजकीय खेळी खेळली.

४) या तडजोडीनंतर राजारामबापू पाटील यांच्या राजकारणाला नवे वळण लागले. धरण जागेची तडजोड झाल्यानंतर दादांचे राजकीय वर्चस्व वाढत गेले. त्यांनी यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांना हाताशी धरून श्री शंकरराव चव्हाण यांना सत्तेवरून खाली खेचले. या सत्ता संघर्षात बापूनी शंकरराव चव्हाण यांना साथ दिली. यानंतर वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. याचदिवशी राजारामबापूनी काँग्रेस पक्षाचा त्याग केला. व जनता पक्षात प्रवेश केला. १९७७ पासून पुढे शेवटपर्यंत बापू विरोधी पक्षातच होते व महाराष्ट्राच्या विरोधी पक्षाचा ते एक महत्वपूर्ण आधारस्तंभ बनले.

५) खुजगांव वाद व खुजगांव धरण परिषदेनंतर राजारामबापूंचा आत्मविश्वास वाढला. त्यांना महाराष्ट्रात एक खास प्रतिष्ठा व आक्रमक नेतृत्व दिले. या वादावेळी सहकार क्षेत्रातील सर्व मान्यवर व्यक्ती बापूंच्या बाजूने होत्या. या वादामुळे बापूंची एक वेगळी प्रतिमा महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झाली. आपल्यावरील अन्याय दुर करण्यासाठी व सरकारला

मार्गावर आणण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात जे जुने मार्ग अवलंबले गेले होते, ते लोकसंग्रहाचे, लोकांच्या चळवळीचे मार्ग या वादामुळे नव्या जोमाने चालविले गेले व पुन्हा एकदा जनतेच्या चळवळीचे व संघटनेचे महत्व दिसून आले.

खुजगांव धरणाबाबत श्री वसंतदादा व राजारामबापू पाटील तडजोड झाली आणि दोघांचेही काही मुद्दे मान्य करण्यात आले. परंतु या धरणाच्या संदर्भात राजारामबापूनी तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. ते आज ही महत्वाचे आहेत.

अ) कालवा पध्दतीने जलसिंचन नैसर्गिकरित्या होते आणि त्याला विजेची गरज भासत नाही. तर उपसा सिंचन हे महागडे आहे.

ब) कालवा पध्दतीच्या धरणांना कमाल जमिन धारणा लागू होईल म्हणून बडे जमिनदार विरोध करतात. कारण त्यात त्यांची जमिन जाते. राजारामबापूनी छोटया शेतक-यांचा प्रश्न हाती घेतला होता.

क) न्याय्य पाणी वाटपाचा प्रश्नही आता धसास लागणार आहे. पाणी योग्य तेवढेच आणि मापून वापरावे. लाभ क्षेत्रातील सर्व शेतक-यांना समान पाणी वाटप व्हावे आणि जमिनीचा कस कायम रहावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. वारणा धरणाच्यावेळी हा प्रश्न पुढे आला नाही. परंतु वरील दोन्ही मुद्दयांबरोबर या मुद्दयाचे महत्व ही लोकांना लक्षात घ्यावे लागणार आहे. खुजगांव की चांदोली या धरण वादाच्या अभ्यासाचा हा निष्कर्ष म्हणायला हरकत नाही.

......

## प्रकरण सहावे

### संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १) | गरूड शांताराम (सं.) | : कृषि औद्योगिक समाजाची २५ वर्षे, १९८५, पृ. १४. |
| २) | ठळक वैशिष्ट्ये वारणा पाटबंधारे प्रकल्प | : महाराष्ट्र शासन, वारणा प्रकल्प, कोल्हापूर, पृ. ३. |
| ३) | पाटील एस्.जे. | : Local paterns & Rural Politics in Maharashtra - A Study of Politics of co-operative and panchayat Raj Institution in Sangli District. |
| ४) | दै. राष्ट्रशक्ती | : दि. १८.६.१९७३. |


.....

# - संदर्भ सूची -


प्राथमिक साधने :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | : | महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८७-८८. |
| २) | कृषि संचयिका | : | महाराष्ट्र शासन, प्रसिध्दी विभाग, मुंबई, १९८३. |
| ३) | वारणा पाटबंधारे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठये | : | वारणा प्रकल्प मंडळ, कोल्हापूर महाराष्ट्र शासन. |
| ४) | वारणा पाटबंधारे प्रकल्प | : | महाराष्ट्र शासन. |
| ५) | योजनेने आपल्यासाठी काय केले | : | महाराष्ट्र शासन, प्रसिध्दी विभाग, १९६१. |

मुलाखती :

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | हुद्दार गजानन | : | दि. १०.९.९१ |
| ७) | खंडागळे दादासाहेब | : | दि. ३.५.९३ |
| ८) | पाटील एल्.डी. | : | दि. २३.३.९३ |
| ९) | पाटील छानबापू | : | दि. २२.३.९३ |
| १०) | पाटील शामराव (आण्णा) | : | दि. १७.३.९३ |
| ११) | पाटील विश्वासराव | : | दि. १८.३.९३ |
| १२) | शिंदे विलासराव | : | दि. २१.३.९३ |

निरनिराळी पत्रके :

१३) चैतन्य स्मरण, १९८५ : राजारामबापू पाटील स्मरणिका.

१४) लोकराज्य : यशवंतराव चव्हाण विशेषांक, महाराष्ट्र शासन, मार्च, १९८५, मुंबई.

१५) लोकराज्य : महाराष्ट्र राज्य रौप्यमहोत्सव विशेषांक, १९६०-१९८५, महाराष्ट्र शासन, मे, १९८५, मुंबई.

१६) पुण्यस्मरण : राजारामबापू पाटील स्मृती विशेषांक.

१७) दै. सकाळ : वसंतदादा पाटील स्मृती विशेषांक १९९१.

१८) कृष्णाकाठ विज्ञानयात्रा : माधव, तासगांव, १९९२.

वर्तमानपत्रे.

१९) दै. अग्रदूत, सांगली

२०) दै. इकॉनॉमिक टाईम्स, मुंबई.

२१) दै. नवसंदेश, सांगली

२२) दै. राष्ट्रशक्ती, सांगली.

पुस्तके :

२३) Baviskar B.I. : Politics & Development Oxford-Daily, 1980.

२४) चव्हाण यशवंतराव : सह्याद्रीचे वारे, प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र शासन, १९६२.

२५) चव्हाण यशवंतराव : युगांतर, कॉन्टीनेन्टल, पुणे, १९७०.

२६) चव्हाण यशवंतराव : भूमिका, प्रिंटेक्स्ट, पुणे, १९७९,

२७) चोळकर पराग : मोठी धरणे, परिसर, पुणे, डिसेंबर, १९८९.

२८) दाभोळकर दत्तप्रसाद : माते नर्मदे, राजहंस, पुणे,१९९०.

२९) हार्डीकर - दास्ताने : महाराष्ट्र, १९९१.

३०) घारे एम्.ए. : पाणी साठवण आणि वापर परिसर चर्चासत्र, १९८८.

३१) गरूड शांताराम (सं) : कृषि औद्योगिक समाजाची २५ वर्षे. गोविंद, कोल्हापूर, १९८५.

३२) इनामदार विजयसिंह : वसंतदादा पाटील व्यक्ती आणि कार्य, सविता, कळंबी मिरज, १९७०

३३) Inamdar N.R. & Others (Ed) : Contempary India, Continental Publi.,Pune, 1986.

३४) जोशी लक्ष्मणशास्त्री (सं) : यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, मौज, मुंबई, १९६१.

३५) जोशी रामभाऊ : यशवंतराव चव्हाण इतिहासाचे एक पान., केसरी, पुणे, मे, १९७६.

३६) गोखले पु.पा. : जागृत सातारा, लोकसेवा संघ, सातारा, १९६६.

३७) Kain Ashok : Govt. & Politics in Maharashtra Sheth Publication, Bombay, 1993.

३८) Lale Jayant : Elite Pluralism and class rule in India, Popular, Bombay, 1982.

३९) Kavalekar K.K. & Chausalkar A.S. (Ed) : Ideas Movements and Politics in India, Ajab, Kolhapur, 1986.

४०) कामत अ.रा. : स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक बदल, मागोवा, पुणे, १९८४.

४१) सुराणा पन्नालाल इतर (सं.) : चेतना, सोलापूर, पाणी, नोव्हेंबर, १९८३.

४२) परांजपे विजय : जलसंधन, स्वरूप आणि व्यवसाय, परिसर चर्चासत्र, १९८८.

४३) पाटणकर भारत व इतर (सं) : कृष्णा कोयना उपसा जलसिंचन, अंकुर, इचलकरंजी, १९८९.

४४) पाटील मोहन : राजयोग, प्रकाश, इचलकरंजी, १९९०.

४५) पाटील पी.डी. (सं.) : यशवंतराव चव्हाण, व्याख्यानमाला, लोकमान्य, कराड, १९८७.

४६) पाटील आर.ए. (सं.) : खुजगांव वादातील सत्य लिंक, मुंबई.

४७) पाटील रा.तु. : सांगली साताऱ्याचे राजकारण, अजय, कराड, १९८६.

४८) पाटील रा.तु. : वसंतदादा पाटील एक दिलदार नेता व राजा माणूस हरि-स्मृती, कोल्हापूर, १९९०.

४९) पाटील रा.तु. : विसाव्या शतकातील प्रारंभीचा ग्रामीण महाराष्ट्र, जय, कोल्हापूर, १९८६.

५०) पाटील विनायकराव : श्री विनायकराव पाटील यांची भाषणे.

५१) पवार के.बी. व इतर (सं) : महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन.

५२) शिंदे आण्णासाहेब : शेती व पाणी, श्री विद्या, पुणे, १९६७.

५३) वाबगावकर रमेश व इतर (सं) लेख. : आपला महाराष्ट्र परंपरा व प्रगती, शासकिय मुंबई, १९८५.

५४) अभ्यंकर प्रसन्नकुमार : वसंतदादा पाटील विकासाचे राजकारण, प्रभात, २ सप्टे., १९८४.

५५) चौसाळकर अशोक : महाराष्ट्रातील सहकार आणि राजकारण समाजप्रबोधन पत्रिका क्र.१२०, सप्टेंबर,१९९२.

५६) पाटील सुभाष : सांगली जिल्हयातील सहकार राजकारणाचे स्वरूप, महाराष्ट्र पॉलिटीक्स ॲण्ड डेव्हलपमेंट या विषयावर राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या चर्चासत्रात वाचलेला निबंध.

५७) जाधव व्ही.आर. : राजारामबापू पाटील एक कुशल संघटक, दै.अग्रदूत १ ऑगस्ट, १९९०.

५८) पळशीकर वसंत : पाणी, चर्चासत्र, १९८८, पाणी-नियोजन-पर्यावरणीय भूमिका.

अप्रकाशित प्रबंध

59) Deshmukh S.A. : Emergence of Agro Industries Society & Political Develop in Maharashtra, A critical study of political ideas of Y.B. Chavan.

60) Patil S.J. : Local Paterns of Rural Politics in Maharashtra. A Study of Politics of Co-operative and Panchayat Raj Inst. in Sangli District.


......